**फाईल क्र. १४४२(१)(२)/२०१९/१३-अ** **दिनांक : १९ जून, २०१९.**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (पूर्व) परीक्षा - २०१९

## पोलीस उप निरीक्षक पदांसाठीचा निकाल

# घोषणा

## (जाहिरात क्रमांक: ०१/२०१९)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (पूर्व) परीक्षा - २०१९ घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेमधून पोलीस उप निरीक्षक पदासाठी विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दिनांक १९ जून, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत पदाकरिता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या व परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**३.** मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्रमांक १ हा दिनांक २८ जुलै, २०१९ रोजी घेण्यात येईल.

**४.** प्रस्तुत निकालाआधारे पोलीस उप निरीक्षक मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शुध्दीपत्रक व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीचे शुध्दीपत्रक व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित "गट-ब" पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजीचे किंवा तद्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यासंदर्भातील पोचपावती सादर करणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडू उमेदवारांनी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल मुलाखतीच्यावेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्र. २०५३/२०१४ तसेच जनहित याचिका क्र.१७५/२०१८ प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**६.** बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत शासकीय/स्वयंसेवी बालगृहात दाखल होणा-या अनाथ मुलांना त्यांच्या संस्थेतील कालावधी संपल्यावर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंडे द्यावी लागतात. अशा अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शासनाच्या महिला व बालविकास विभागाने शा. नि.क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि. २ एप्रिल, २०१८ अन्वये शिक्षण व नोकरी यामध्ये १% आरक्षण लागू केले आहे. शासन मागणीपत्रानुसार प्रस्तुत पदाच्या जाहिरातीमध्ये अनाथ मुलांसाठी आरक्षण विज्ञापित करण्यात आले आहे.

पोलीस उप निरीक्षक पूर्व परीक्षेच्या ऑनलाईन अर्जामध्ये अनाथ आरक्षणाचा दावा केलेले व प्रस्तुत निकालाआधारे पोलीस उप निरीक्षक मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या अनाथ उमेदवारांनी महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दि. २ एप्रिल, २०१८ व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दि. ६ जून, २०१६ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार सक्षम प्राधिका-यांनी दिलेले विहित नमुन्यातील " अनाथ असल्याचे प्रमाणपत्र" मुलाखतीच्यावेळी सादर करणे बंधनकारक आहे.

**७.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**८.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पदधतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परिक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह ठरतील.

**ठिकाण : मुंबई**

**उप सचिव (परीक्षा १)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**